# माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ अंतर्गत १७ मॅन्युअल्स

# माहिती पुस्तिका

.....................................

विष्णुप्रसाद नंदराय देसाई महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय,

सांताक्रुझ (पू), मुंबई ४०० ०५५.

.......................................

डॉ. हरबन्ससिंग बावा

वैद्यकिय  अधिक्षक (प्रभारी)

.......................................

डॉ. जयराज आचार्य

वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी

.......................................

# प्रकरण – १

१.१ सदर हस्तपुस्तिका महाराष्ट्र राज्य माहितीचा अधिकार अधिनियम क्र.२२ सन २००५ नुसार प्रसृत करण्यात येत आहे.

१.२ सदर हस्तपुस्तिकेचा उद्देश्य महाराष्ट्र सरकार सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयानुसार जनतेला रुग्णालयांसंबंधित माहितीच्या उपलब्धतेचा आराखडा आखणे तसेच रुग्णालयीन कामकाजात पारदर्शकता जबाबदारी आणणे हा आहे.

१.३ ही हस्तपुस्तिका सर्वसामान्य जनतेस वापरासाठी उपलब्ध आहे.

१.४ पुस्तिकेच्या माहितीची रचना


| प्रकरण | अंतर्भूत तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | |
| २. | संस्था, संस्थेची कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील | |
| ३. | अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये | |
| ४. | कार्यपूर्तीसाठी नियम, विनियम, सूचना पुस्तिका आणि अभिलेख | |
| ५. | धोरणाची आखणी किंवा त्याच्या अंमलबजावणी संबंधात जनतेच्या प्रतिनिधीचा सल्ला किंवा त्यांचे प्रतिनिधीत्व करण्याबाबत विद्यमान व्यवस्थेचा तपशील | |
| ६. | धारणाधीन किंवा नियंत्रणाधीन दस्ताऐवजाच्या प्रकारांचे विवरणपत्र | |
| ७. | घटक म्हणून प्रस्थापित झालेली मंडळे, परिषदा, समित्या व इतर गट याबाबतचे विवरणपत्र | |
| ८. | माहिती अधिका-यांची नावे, पदनाम व अन्य तपशील | |
| ९. | निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये अवलंबली जाणारी पद्धत | |

| | | |
|---|---|---|
| १०. | अधिकारी व कर्मचा-यांची निर्देशिका | |
| ११. | नियमांतर्गत उपलब्ध अ्सलेल्या भरपाई योजना कार्यप्रणालीसह, प्रत्येक अधिकारी व कर्मचा-यांना मिळणारा मासिक मोबदला | |
| प्रकरण | अंतर्भूत तपशील | पृष्ठ क्र. |
| १२. | प्रत्येक अभिकर्तासाठी दिलेली अर्थसंकल्पीय तरतूद (सर्व योजना, प्रस्तावित खर्च आणि विवरण अहवाल यांचा तपशील) | |
| १३. | अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजाणीची पद्धत | |
| १४. | संस्थेने दिलेल्या सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे प्राप्त करणा-यांचा तपशील | |
| १५. | संस्थेने आपल्या कार्यपूर्तीसाठी आखून दिलेली प्रमाणके | |
| १६. | इलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती | |
| १७. | माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांची सूची | |
| १८. | इतर उपयुक्त माहिती | |

१.५ व्याख्या:

१) माहिती अधिकारी

प्रमुख वैद्यकीय अधिक्षक (माध्यमिक आरोग्य सेवा) हे महानगरपालिकेच्या सर्व १८ उपनगरीय रुग्णालयांचे प्रमुख आहेत.

वैद्यकीय अधिक्षक हे विष्णुप्रसाद नंदराय देसाई महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाचे प्रमुख आहेत.

वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी हे या रुग्णालयाचे जनमाहिती अधिकारी आहेत.

२) माहिती: रुग्णालयासंबंधी माहिती व दस्ताऐवज

३) सक्षम अधिकारी: संबंधित विभागाचे प्रमुख / सक्षम अधिकारी

१.६ या पुस्तकामध्ये उपलब्ध असलेल्या विषयांच्या अधिक माहिती बाबत किंवा इतर माहिती उपलब्धतेबाबत

वैद्यकीय अधिक्षक / वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी आणि प्रमुख वैद्यकीय अधिक्षक यांच्याशी संपर्क साधणे.

१.७ ज्या व्यक्तीस या कायद्यान्वये माहिती हवी आहे त्यांनी मागणी लिखित स्वरुपात मराठी, इंग्रजी, हिंदी भाषेचा वापर करुन आवश्यक ते विहित शुल्क भरुन जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, विष्णुप्रसाद नंदराय देसाई महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, सांताक्रुझ(पूर्व), मुंबई – ४०००55 ह्यांचेकडे करावी.